केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक २ मार्च २०११

श्री राम चन्द्र मिशन®

India ECHOES ONE WORLD ONE HUMANITY

## चेन्नई येथील पोंगल





पोंगलच्या सणादरम्यान चेन्नई येथील आश्रम भेटीकरिता आलेल्या अभ्यासींनी गजबजलेला होता. या वेळी पू. गुरुदेवांनी अनेक भारतीय तसेच परदेशी अभ्यासींचे विवाह संपन्न केले व मणपक्कम तसेच नत्रमपल्ली आश्रम येथे महिन्याभराचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान केली. प्रसिद्ध तमिळ चित्रपट दिग्दर्शक व अभ्यासी बंधू लिंगुसामी आपल्या सहाय्यकांसमवेत पू. गुरुदेवांच्या कुटीरात तसेच आश्रमात अनेक ठिकाणी गुरुदेवांची छायाचित्रे घेताना दिसत होते. बाबूजी मंडपाजवळ अभ्यासींशी बातचीत करतानाही काही छायाचित्रे घेण्यात आली.

दि. १३जानेवारी रोजी पू. गुरुदेवांनी स्थायी समितीच्या सभेचे संचलन केले. यानंतर मिशनच्या अधिकाऱ्यांबरोबर अनौपचारिक वार्तालाप करताना त्यांनी मिशनच्या कामाकरिता योग्य उमेदवाराची निवड करण्याची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले, "बाबूजींनी मला संगितले होते, चारित्र्यवान व सुशिक्षित व्यक्तींची निवड तू कर. त्यानंतर त्यांना क्षमता प्रदान करणे हे माझे काम आहे".

दि. १५ जानेवारी रोजी बाबूजी मेमोरियल आश्रमात सुमारे ४५०० अभ्यासी व ५०० लहान मुले उपस्थित होती. पू. गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचलन केल्यानंतर बंधू आर. चक्रपाणी यांनी गुरुदेवांप्रति आपले प्रेम प्रकट करणारे एक आकर्षक भाषण केले. या वेळी त्यांनी काही तामिळ चित्रपटगीतांचा उल्लेख केला व त्यांचा संबंध आध्यात्मिकता व गुरुदेवांशी जोडला.

दि. १६ जानेवारी रोजी, 'माट्टू पोंगल' या दिवशी प्रथेनुसार पूज्य गुरुदेवांनी आश्रमातील गोथ्याला भेट दिली. या दिवशी शेतकरी बंधू आपल्या गुरा-ढोरांना सजवतात व उत्सव साजरा करतात.

या कालवधीत गुरुदेव बऱ्याच कालवधीनंतर होणाऱ्या आपल्या दुबईच्या परदेशप्रवासाचे बेत आखत होते. दि. १९ जानेवारी रोजी सकाळी गुरुदेवांनी दुबईकरिता प्रस्थान केले.





## दुबई

### दुबई येथील एस.एम.एस.एफ. ध्यान-कक्षाचे उद्घाटन- दि. २१ जानेवारी २०११


एस.एम.एस.एफ.च्या मध्यपूर्वेतील बखरीत ऐतिहासिक व अभूतपूर्व म्हणून नोंदला जावा असा हा प्रसंग होता. सन १९९४ मध्ये जेव्हा गुरुदेवांना विचारणा करण्यात आली होती की या प्रदेशात ध्यान-केंद्र होऊ शकेल का, त्यावर ते उत्तरले होते की "जर तुम्ही लोकांनी ध्यान केले व परिश्रम केले तरच त्यांच्या कृपेने हे साकार होईल". गुरुदेवांचे अथक लक्ष, या प्रदेशाला त्यांनी दिलेल्या भेटी व गेल्या दोन दशकांतील त्यांचे प्रेम व मार्गदर्शन यामुळे मध्य-पूर्वेतील देशांमध्ये सुमारे १५०० अभ्यासी व १०० प्रशिक्षक असे सहज मार्ग कुटुंब निर्माण झाले आहे.

दि. १९ जानेवारी रोजी गुरुदेवांच्या आगमन-प्रसंगी त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले. दुपारच्या भोजनाची वेळ असूनही गुरुदेवांनी उपस्थित अभ्यासींना सिटींग देण्याचे ठरवले. दि. २० जानेवारी रोजी ईराणीयन क्लबच्या सभागृहात गुरुदेवांनी सत्संगाचे संचलन केले व सुमारे सहा वर्षांपूर्वी याच ठिकाणी त्यांनी पहिले सत्र कशा प्रकारे संचलित केले होते याची आठवण काढली. या प्रसंगी ईराणीयन क्लबच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या गेल्या वर्षांतील सहकार्याबद्दल, कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून स्मृतिचिन्ह अर्पण करण्यात आले.

अत्यंत वेगाने आकार घेत असणाऱ्या जुमैरा लेक टॉवर्स येथील केंद्राचे उद्घाटन करण्याकरिता दि. २१ जानेवारी रोजी गुरुदेवांचे आगमन झाले. आश्रम कमिटी व मध्य-पूर्वेतील प्रशिक्षकांनी गुरुदेवांचे स्वागत केले. नाम-स्तंभाचे अनावरण करुन गुरुदेवांनी हे ध्यान-केंद्र पूज्य बाबूजींच्या स्मृतिला अर्पण केले. उद्घाटनाची फीत कापून, पडदे बाजूला सारून, आतील नयन-मनोहर दृष्य सर्वांसमोर खुले करणाऱ्या, अनेक पडद्यांवर दृष्यमान होणाऱ्या गुरुदेवांचे दर्शन घेत सुमारे ११०० अभ्यासी अत्यंत स्तब्ध राहिले होते. सहज मार्गाच्या सर्व गुरूंची अवतरणे या केंद्राच्या भिंतींना सुशोभित करत होती.

खंड ४ अंक २ मार्च २०११
श्री राम चन्द्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र






सत्संगाचे संचालन केल्यानंतर पू. गुरुदेव उद्गारले की आत्ता संपलेल्या सिटींगबद्दल बोलण्यासारखे बरेच काही आहे. या आनंदी प्रसंगाची आठवण म्हणून गुरुदेवांनी एका स्मरणिकेचे प्रकाशन केले. मध्य-पूर्वेतील गुरुदेवांच्या प्रवासाचे फोटो असणारे पुस्तक व त्यांच्या निवडक भाषणांची डि.व्हि.डि. यांचा या स्मरणिकेत समावेश होता.

या मुक्कामात गुरुदेवांनी पाकिस्तान, कुवैत, बहारिन, ओमान, ईराण, सौदी, अल्जेरिया, ट्युनिशिया व इजिप्त येथून आलेल्या अभ्यासींच्या लहान गटांच्या भेटी घेतल्या. या सत्रांमध्ये गुरुदेवांनी त्यांच्या नैसर्गिक, खेळकर तही विद्वत्तापूर्ण पद्धतीने सूचना तशीच प्रेरणा दिली आणि त्यांना स्वतःकडे आकर्षित केले. पाकिस्तानातून आलेल्या २० अभ्यासींच्या चमूबरोबर गुरुदेवांनी बराच वेळ व्यतीत केला. कित्येक अभ्यासींकरिता गुरुदेवांच्या सहवासाची ही पहिलीच संधी होती.

दुबईच्या मुक्कामात गुरुदेव अभ्यासींच्या निवासस्थानांना भेटी देत असत, सिटींग देत असत किंवा विश्रांती घेत असत ,आध्यात्मिक विषयांवर चर्चा अथवा जुन्या आठवणींना उजाळा देत असत; ज्यामुळे अभ्यासींच्या अंतर्गत कृतीला चालना मिळत असे. एक-दोन वेळा ते स्वत: बाजारात फेरफटका मारण्याकरिता गेले. भोवतालच्या पर्यावरणाला आणि माणसांना, केवळ गुरुदेवांनाच शक्य असणारी, आपल्या प्रेमळ अस्तित्वाची अनुभूती त्यांनी दिली.

व्यक्तीची पार्श्वभूमी, जात, धर्म या बंधनांशिवाय, सर्वांच्या उपयोगाकरिता निर्मिलेले नवे एस.एम.एस.एफ.-मानवी एकीकरणाचे ध्यान-केंद्र, गुरुदेवांनी जाणीव करून दिल्याप्रमाणे, आपल्या पुढील पिढ्यातील माणसांकरिता शांती व समाजाकरिता ऐक्य निर्माण करेल.

गुरुदेवांकडून प्राप्त झालेली काही मौक्तिके :

- बाबूजी महाराज म्हणत असत, "कुठलीही गोष्ट दिसते तितकी सोपी नसते आणि वाटते तितकी कठीणही नसते, अगदी कुठलीही !"
- एका भगिनीने गुरुदेवांजवळ येऊन त्यांना विनवले,"मला आपल्या मदतीची गरज आहे". यावर गुरुदेव उत्तरले, "आपणा सर्वांना मदतीची आवश्यकता आहे. मी तुम्हाला मदत करेन. तुम्ही मला मदत केली पाहिजे व मी सुद्धा तुम्हाला मदत केली पाहिजे. आपण सर्वांनी एकत्र पुढे गेले पाहिजे. हा विनोद नाही. मी हसत आहे पण विनोद करत नाही. मी गांभीर्याने बोलत आहे. मी तुम्हाला मदतीचे आश्वासन देतो आणि तुम्हीदेखील मला मदत करावी."
- "आपल्या कार्यशाळा शिक्षणाभिमुख नसून स्फूर्ती देणाऱ्या असाव्यात."
- मध्य-पूर्वेतील लोकांच्या जीवनाबद्दल बोलताना गुरुदेव म्हणाले "बदल येत आहे, संथपणे तरीही खात्रीलायकपणे येत आहे...यासाठी आवश्यकता आहे ती चिकाटी व प्रार्थनेची."

## गुरुदेवांचा उत्तर भारताचा प्रवास

### दि. २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०११

दुबईतील (संयुक्त अरब अमिरात) दहा दिवसांच्या वास्तव्यानंतर दि. २८ जानेवारी रोजी गुरुदेवांचे दिल्ली येथे आगमन झाले. दि. २९ जानेवारी रोजी त्यांनी दोन सत्संगांचे संचलन केले व दि. ३० रोजी गुरगाव आश्रमात रविवारच्या सत्संगाचे संचलन केले. त्यानंतर गुरुदेवांनी द्रोणाचार्यांच्या नवीन पुतळ्याचे अनावरण केले. दुपारच्या भोजनानंतर आपल्या कार्यालयाच्या बाहेर येऊन अभ्यासींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. १ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी दोन विवाह संपन्न केले व रुद्रपूर येथे जाण्याकरिता प्रयाण केले.





खंड ४ अंक २ मार्च २०११
श्री राम चन्द्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र


रुद्रपूर


नौकुचिआतल

## लालाजी महाराज जयंती – रुद्रपूर

पू. गुरूदेवांनी सकाळी साडेसात वाजता त्यांच्या कुटीरामधे सत्संगाचे संचलन केले, तो रुद्रपूर मधील एक अद्वितीय प्रसंग होता. आपले आदि गुरु पूज्य लालाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यासाठी जवळपासच्या केंद्रामधून सुमारे दोनशे अभ्यासी जमले होते. गुरूदेव अत्यंत प्रसन्न दिसत होते आणि त्यांना तणावमुक्त अवस्थेत पाहून सभोवतीचे अभ्यासीसुद्धा आनंदी होते. पू. गुरूदेवांनी संध्याकाळी ५.०० वाजता सत्संगाचे संचालन केले,त्यानंतर बंधू गुरप्रीत यांनी काही भजने सादर केली. आफ़्ताब–ए–मर्फ़त या लालाजी महाराजांच्या आवडत्या भजनाने झालेली या कार्यक्रमाची सांगता गुरुदेवांना सुखद आश्चर्याचा अनुभव देऊन गेली. हिमालयातील सतखोल आश्रमात जाण्यापूर्वीचा गुरूदेवांचा रुद्रपूरमधील मुक्काम स्वस्थ व गडबडीपासून मुक्त होता.

## नौकुचिआतल मधील मुक्काम

दि. ४ फेब्रुवारी रोजी गुरुदेव नौकुचिआतल येथे जाण्याकरिता निघाले. तेथील कार्यालयाचे केलेले नूतनीकरण आणि त्यामधे केलेले बदल गुरुदेवांना आवडले. त्यांनी आपला तेथील मुक्काम एक दिवस वाढवला. गुरुदेवांनी आपल्या कार्यालयामधे प्रत्येक दिवशी सकाळी व संध्याकाळी सत्संगांचे आयोजन केले. जवळजवळ दोनशे अभ्यासी अतिशय शिस्तपूर्वक गच्ची व खोल्यांमधे बसले होते. दुसऱ्या दिवशी अनौपचारिक गप्पांमधे, ते सुख आणि वेदना याबद्दल बोलत होते. सुख कसे एखादयाला दुबळे करते आणि वेदना कशी बलवान करते याविषयी ते यावेळी बोलले. एका पाहुण्याने गुरुदेवांना विचारले की जर आपली हृदये आधीच शुद्ध असतील तर आपल्याला अध्यात्मिक साधनेची गरज आहे का?. तेव्हा गुरुदेव म्हणाले, 'केवळ हृदय शुध्द असणे पुरेसे नाही. ती तर मुलभूत गरज आहे. आपले हृदय शुध्द झाले की तेथे दिव्यत्व वसवणे गरजेचे आहे.' गुरुदेवांनी रविवारी सकाळी सत्संगाचे संचलन केले आणि सतखोल कडे प्रयाण केले.

## सतखोल मधे बसंत पंचमीकरिता

खराब रस्त्यांमुळे झालेल्या खडतर प्रवासानंतर दि. ६ फ़ेब्रुवारीला सकाळी ११ वाजता सतखोलमधे गुरुदेवांचे आगमन झाले. जे अभ्यासी परवानगी न घेता आले होते त्यांना दुपारच्या जेवणानंतर निघून जाण्यास सांगण्यात आले. दि. ७ रोजी सकाळी वाजता गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर त्यांनी दोन विवाह संपन्न केले आणि ग्रंथालयाचे व सत्रकक्षाचे उद्घाटन केले आणि त्यांच्या या भेटीदरम्यानच एक सत्र आयोजित करण्याचे सुचविले.

गुरुदेवांनी दि. रोजी सकाळी ९ वाजता बसंत सत्संगाचे संचालन केले. ते गेली काही वर्षे नियमितपणे बसंत पंचमी सतखोल येथे साजरी करत आहेत. गुरुदेव सत्संगानंतर थकले होते तरीसुद्धा मिशनच्या नवीन साहित्याचे प्रकाशन करण्यासाठी बसून राहिले होते. त्यानंतर एका संघटना–कुशल अभ्यासी बंधूने व्यवस्थापनाच्या तत्त्वांवर सादर केलेल्या सत्राला उपस्थित राहिले. या दीड तासाच्या भाषणाचा गुरुदेवांनी मनापासून आनंद घेतला त्यामुळे ते प्रफुल्लित झाले. त्यानंतर वाटेतल्या वाढलेल्या देवदार वृक्षांचे निरिक्षण करत, चालत ते आपल्या कार्यालयात गेले. गुरुदेव त्यानंतर कार्यालयासमोरील जागेतील सहलभोजनात सामील झाले.

## हल्दवानी येथील नवीन आश्रमाचे उद्घाटन


दि. ९ फेब्रुवारीला गुरुदेवांनी रुद्रपूरला प्रयाण केले. दि. च्या सकाळी ते नवीन बांधण्यात आलेल्या आश्रमाचे उद्घाटन करण्यासाठी हल्दवानीला गेले. गुरुदेवांच्या स्वागतासाठी आश्रमाकडे जाणारा रस्ता पताकांनी (या भागातील सजावटीची पारंपारिक पद्धत) सजवला होता. गुरुदेवांनी आश्रमशीलेचे


सतखोल






खंड ४ अंक २ मार्च २०११
श्री राम चन्द्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र


हल्दवानी

अनावरण केले आणि फीत कापून त्यांच्या कार्यालयात प्रवेश केला.

यावेळी पारंपारिक रंगीबेरंगी कपडे परिधान केलेल्या स्थानिक भगिनींनी गाणी गायली. त्यानंतर पू. गुरुदेवांनी बाबुजी महाराजांना नैवेद्य अर्पण केला. स्वयंपाकघरात अग्नी प्रज्वलीत केल्यानंतर ते, त्यांचे व्यासपीठ म्हणून तयार केलेल्या गच्चीवर गेले व तेथून त्यांनी सुमारे १२०० अभ्यासींसाठी सत्संगाचे संचलन केले. त्यानंतर केलेल्या भाषणात त्यांनी सांगितले की आश्रमाचा उपयोग फक्त अध्यात्मिक प्रगतीसाठीच केला पाहिजे. ते अभ्यासींसोबत उन्हात बसले आणि अभ्यासींना ध्यान करताना आलेले अनुभव त्यांनी श्रवण केले. दुपारच्या जेवणानंतर गुरुदेव रुद्रपूरला परतले.

या दौऱ्यामधील काही अवतरणे :

- ❖जेव्हा तुम्ही कठोर परिश्रम करता, हृदयाचा कौल घेऊन काम करता तेव्हा तुमच्या केसालाही धक्का लावण्याचे धाडस कोणी करु शकत नाही.
- ❖मेंदूतील दोन मज्जातंतूंना जोडणाऱ्या दुव्याप्रमाणे इच्छाशक्ती ही निर्णय घेणे आणि तो अंमलात आणणे यातील बलस्थान आहे.
- ❖शिस्त म्हणजे कामाला लावलेली इच्छाशक्ती.
- ❖प्रेम करण्यास नाखुश असणे म्हणजे प्रेम करण्यास असमर्थ असणे नव्हे.
- ❖बाबुजींचा दाखला देऊन, गुरुदेव म्हणाले, "चिंता म्हणजे भरकटलेले विचार होय'".
- ❖सुख हे क्षणिक आहे तर आनंद ही एक चिरंतन अवस्था आहे.

दि. १२ फेब्रुवारीच्या संध्याकाळी गुरुदेवांनी त्यांच्या कुटीराबाहेर परदेशी अभ्यासींच्या गटाने सादर केलेल्या संगीत व बासरीवादनच्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. दुसऱ्या दिवशी त्यांनी रविवारच्या सत्संगाचे संचलन केले व दिल्लीला प्रयाण केले. वाटेत ते दुपारच्या जेवणासाठी मोरादाबाद येथे थांबले.



## जोधपूर – एक अविस्मरणीय भेट

पू. गुरुदेवांच्या सध्याच्या आध्यात्मिक सफ़रीमध्ये दहा वर्षांच्या कालखंडानंतर जोधपूरला दिलेल्या छोट्याशा भेटीचा समावेश आहे. नवीन ध्यानकक्ष म्हणजे जणू गुरुदेवांनी या वाळवंटी प्रदेशाला दिलेले अध्यात्मिक हिरवळीचे बक्षीसच आहे अशी भावना तेथे जमलेल्या तीन हजार राजस्थानी अभ्यासींच्या मनात होती.

दि. १५ फेब्रुवारी रोजी विमानाने दिल्ली येथून गुरुदेवांचे आगमन झाले. येताना ते आपल्यासोबत दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसापासून सुटका आणि हवेहवेसे वाटणारे ऊन घेऊन आले. रुद्रपूर ते दिल्ली या दूरच्या प्रवासानंतर सुध्दा ते ताजेतवाने वाटत होते.

पू. गुरुदेव दोन वेळा बाहेर आले आणि त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला म्हणून सर्व अभ्यासी उल्हासित झाले होते. पू. गुरुदेव अभ्यासींसोबत हिरवळीवर बसले आणि त्यांनी भरपूर वेळ गप्पा मारल्या, त्यावेळी गुरुदेवांच्या कुटीराचे फाटक उघडे होते. गुरुदेवांचे चरणस्पर्श करणाऱ्या एका भगिनीस त्यांनी सांगितले की आपल्या प्रणालीमध्ये यास परवानगी नाही व आपण करत असलेल्या कृतींच्या परिणामांचा विचार न करता या गोष्टी करू नयेत. त्यांनी असादेखील सल्ला दिला की जे या प्रणालीच्या विरुद्ध आहेत व ज्यांना अभ्यासींबद्दल शत्रुत्व आहे, त्या सर्वांसाठी आपण प्रार्थना करावी.

दि.१६ फ़ेब्रुवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता जोधपूर आश्रमाच्या उद्घाटनानंतर गुरुदेवांनी नवीनच बांधण्यात आलेल्या ध्यानकक्षामध्ये सत्संगाचे संचलन केले. भगिनी रंजना मेहता यांनी गायलेल्या भजनानंतर गुरुदेवांनी कार्यालयास भेट दिली व सूर्यप्रकाशाचा आनंद घेत अभ्यासींसोबत वार्तालाप केला. संध्याकाळी ते सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतलेल्या मुलांना भेटण्यासाठी बाहेर आले.


दि. १७ फ़ेब्रुवारी रोजी सत्संगात सामील न होता गुरुदेवांच्या भेटीसाठी कुटीरात थांबलेल्या अभ्यासींबाबत गुरुदेवांनी नापसंती दर्शवली. सकाळी ११.३० वाजता गुरुदेवांनी सर्व स्वयंसेवकांना सिटींग दिले. एका चर्चेदरम्यान, अनोख्या अशा स्थानांना भेटी देण्याबाबत गुरुदेव म्हणाले की या गोष्टी खऱ्या मूल्यांपेक्षा गर्वाला बळकटी देणाऱ्या आहेत. त्यानंतर दुपारी गुरुदेवांनी दिल्लीस प्रयाण केले.


मोरादाबाद


जोधपूर




# नवीन प्रकाशने




अवार सोलवधु यथेनील–३
तमिळ





ह्रदयीचे बोल २००६
कन्नड



शाश्वत सत्य
मल्याळम




श्री राम चंद्, की संपूर्ण
कृतिया




द वंडरफूल १० ॲन्ड व्हाय
स्पेनिश, डेनिश,इटालियन, जर्मन,
इंग्रजी, हिंदी, फ्रेंच, आणि
पोर्तुगीजमधे.

वसंतपंचमीच्या दिवशी गुरुदेवांनी ही प्रकाशने प्रकाशित केली.





ह्रदयीचे बोल २००८
मराठी




ह्रदयीचे बोल २००८
गुजराथी




ह्रदयीचे बोल २००८
हिंदी




प्रे फॉर चेंज
डी व्ही डी संच

# उदघोषणा

## नवीन नेमणुका

**श्री अजय कुमार भट्टर**
विभाग प्रमुख , पश्चिम बंगाल ( विभाग १३ )

**मिसाल मेहता**
केंद्र व्यवस्थापक, कोलकाता केंद्र

**दीपक साह**
केंद्र प्रमुख, हल्दवानी

**अनिल सिंग बिश्त**
आश्रम व्यवस्थापक, हल्दवानी

## गुरुदेवांच्या जन्मदिवसाचा उत्सव

गुरुदेवांनी त्यांचा ८५ वा जन्मदिवस डायमंड ज्युबिली पार्क, तिरुप्पूर (तमिळनाडू) येथे दि.२३ जुलै ते २५ जुलै, २०११ या दरम्यान साजरा करण्याची परवानगी दिली आहे. हा एक राष्ट्रस्तरीय उत्सव असेल. सर्व अभ्यासींना यात सहभागी होण्याचे व आपल्या प्रिय गुरुदेवांच्या सहवासात राहण्याचे आमंत्रण दिले जात आहे.

# भूतकाळाचे पूनरावलोकन

बाबुजींच्या मलेशियाच्या समुद्रापार दौ-याच्या आधी, ते काही दिवस चेन्नईला होते. खालील सारांश हा गुरुदेवांच्या रोजनिशीतील आहे.



### रविवार, ३ एप्रिल,१९७७

गुरुदेव सकाळी ८ वाजता गायत्रीमधे आले. बाहेरगावच्या अभ्यासींना रविवार सकाळच्या सत्संगात सहभागी होता यावे यासाठी सत्संगाची वेळ बदलून सकाळी ९.०० वाजता ठेवण्यात आली होती. त्यातच मिशनच्या नेल्लोर केंद्राच्या आणखी एक बस भरून आलेल्या अभ्यासींची भर पड्ल्यामुळे घर अभ्यासींनी पूर्ण भरुन गेले होते. त्यादिवशी सकाळी जवळजवळ पाचशे पेक्षा जास्त अभ्यासी गायत्रीमधे हजर होते. वरील गच्ची, खालच्या मजल्यावरील कक्ष, बाहेरील ओसरी, फरसबंदी केलेला गाडीचा रस्ता सर्व काही गच्च भरुन गेले होते. तेथे बसंत पंचमीचे वातावरण होते. गुरुदेवांनी त्यांच्या खोलीतून अभ्यासींना चाळीस मिनीटांपेक्षा जास्त वेळ प्राणाहुती दिली. ते एक उत्कृष्ट सिटींग होते.

सिटींग नंतर सर्व अभ्यासींना इडली, वडे, चहा व केळी असा नाश्ता देण्यात आला. ही सेवा दीड तास चालली होती. गुरुदेवांना विश्रांती घेता यावी यासाठी सकाळी ११.३० वाजता सर्व गर्दी पांगली. इडली आणि सांबारच्या हलक्या जेवणानंतर दुपारी गुरुदेवांना छान विश्रांती मिळाली. सर्व अभ्यासी गोळा झाल्यामुळे संध्याकाळी ४ वाजता पुन्हा एकदा घर भरुन गेले. खालील आणि वरील दोन्ही मजल्यांवर एकाच वेळी प्रशिक्षक बंधू श्री. एस. के. राजगोपालन, श्री.सी. ए. राजगोपालाचारी,आणि श्री. व्ही. वेंकटापथी हे सहजमार्गावर भाषणे देत होते. तेथे प्रश्नोत्तरांची सत्रे देखील होती. संध्याकाळी ६.३० वाजता गुरुदेवांनी परत एकदा जवळजवळ २० मिनीटे सत्संगाचे संचलन केले. रात्रीच्या जेवणानंतर गुरुदेवांनी बसंतनगर कडे प्रयाण केले. तो दिवस सर्वांसाठी खूपच आनंदाचा आणि आध्यात्मिक लाभाचा होता. इतके सारे लोक, इतक्या दुरुन त्यांना भेटण्यासाठी आले म्हणून गुरुदेव खूप आनंदात होते.

तीन बस भरून आलेले आंध्रप्रदेशचे अभ्यासी संध्याकाळी निघून गेले. खरोखर, बहुतेक सारे बाहेरगावचे अभ्यासी संध्याकाळी त्यांच्या घरी जाण्यासाठी निघून गेले.

यात्रा, खंड दुसरा–ब्लॉसम्स इन द ईस्ट

केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक २ मार्च २०११

श्री राम चन्द्र मिशन®

एकोज इंडिया वार्तापत्र

# पूज्य लालाजी महाराजांच्या

## १३९ वा जयंती महोत्सव

"आनंद बाहेर कोठेही नाही. तो आपल्या आत लक्ष स्थिर करण्यात, स्वभावाच्या स्थैर्यात आणि आपले मन निरीच्छ करण्यात आहे. ज्यांना हे गुपित माहित आहे त्यांना बाहेर आनंद शोधण्याची गरजच नाही."

लालाजी महाराज



जोधपूर



बेंगलोर

आपल्या मिशनचे आदि गुरु, समर्थ गुरु पूज्य लालाजी महाराजांची १३९ वी जयंती देशभरातील विविध केंद्रांमधे मोठया उत्साहाने आणि भक्तिपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. बहुतेक सर्व केंद्रांमधे कार्यक्रमाची सुरवात सकाळी ७.३० वाजता होणाऱ्या सत्संगाने झाली. अनेक ठिकाणी लालाजींच्या जीवनावरील चित्रफीत दाखवली गेली, आपल्या गुरुदेवांची लालाजी महाराजांविषयी असलेली भाषणे ऐकवली गेली, 'शाश्वत सत्य' याविषयावर चर्चा केली गेली, काही भजने, छोट्या नाटिका, आणि सांस्कृतिक कार्यक्रम अभ्यासींनी व मुलांनी सादर केले. काही जणांनी खुल्या मंचाचे आयोजन केले किंवा २०१० निबंध लेखन उपक्रमाचा बक्षीस समारंभ केला. दिवसभराच्या कार्यक्रमाची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली.


हुबळी

अलाहाबाद (ऊ.प्र.) येथे या कार्यक्रमांव्यतिरिक्त, एका दंत चिकित्सालयाचे उद्घाटन डॉ. व्ही. के. अगरवाल यांच्या हस्ते करण्यात आले. निबंध लेखन उपक्रमाची प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. इंदूर (म.प्र.) मधे, मिशनच्या नवीन जागेमध्ये सुमारे ८०० अभ्यासी जमा झाले होते. यावेळी 'मी पाहिलेले माझ्यातील बदल' या आत्मनिरीक्षणपर सत्राचे संचालन करण्यात आले, ज्यात अभ्यासींनी त्यांचे अनुभव कथन केले. विजयवाडा (आं.प्र.) येथे भाषणांव्यतिरिक्त, गुरुदेवांच्या शिकवणीवरील चाचणी परीक्षा ४०० अभ्यासींसाठी आयोजित करण्यात आली. हैद्राबाद, येथे थुमकुंटा आश्रमात २००० अभ्यासींनी 'स्वत:तील परावर्तनाची शक्ती' या विषयावरील छोटी नाटिका पाहिली. त्या व्यतिरिक्त गुरु पादुकाभ्यम ह्यांचे हृदय हेलावणारे नृत्य पाहिले.


इंदूर

अंगुल (ओरिसा) येथे सुमारे १२० अभ्यासींनी लालाजींच्या जीवनावरील चित्रफीत, भाषणे तसेच खुले चर्चासत्र आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. देशाची राजधानी, दिल्ली येथे 'इच्छा ते अनिच्छा' आणि 'समर्पणाद्वारे संस्कारांपासून मुक्ती' याचे प्रभावी शब्दचित्रण करणाऱ्या 'लक्ष' व 'कठपुतली' या दोन अनुभवातीत नाटिका सादर करण्यात आल्या.



लालपानिया

कर्नाटकमधे, गुलबर्गा येथील समारोहात चिंचोली, चित्तापूर, वाडी, शहापूर, आणि सेदम या छोट्या केंद्रांमधील सुमारे ३५० अभ्यासी सहभागी झाले होते. सीरसी, बेलूर, धारवाड, कल्लूर, गदग, नवनगर, नवलगुंड,आणि हवेरी या केंद्रांमधील सुमारे २४० अभ्यासी हुबळी केंद्रातील सोहळ्यात सामील झाले होते. तरुणांच्या संघाने 'गरुडाची द्विधास्थिती' ही नाटिका उत्कृष्टपणे सादर केली. बेंगलोर येथे १५०० अभ्यासींनी परमधाम येथे गुरुदेवांवर भाषणे, त्यांची शिकवण व त्यांच्या भंडाऱ्यातील जुन्या आठवणी काढून हा दिवस साजरा केला. मेंगलोर आणि कोल्लेगल, येथे लालाजी महाराजांची शिकवण व लिखाण हे केंद्रस्थानी होते.


हैद्राबाद

जोधपूर (राजस्थान) मधे, केरू गावानजिक जेसलमेर मार्गावरील नवीन आश्रमाच्या जागेवर उत्सव साजरा करण्यात आला. गुरु आणि शिष्याच्या प्रेमाचे मूर्तिमंत चित्रण करणारी नाटिका फलकावर लावली होती. गुवाहाटी आणि तिनसुकिया (आसाम) मधे, 'निरीक्षण करा, आज्ञापालन करा, आणि त्यांच्यासारखे बना.' यावर भाषणे होती.

तिरुनेलवेली (तामिळनाडू) मधे, बंधू ए. पी. दुराई (सहसचिव) उत्सवासाठी हजर होते. तेथे कन्याकुमारी, पानागुडी, कोलीयनकुलम, वडकांगुलम, तुतीकोरीन, तेनकासी, नागरकोइल, राजापालायम, कोवीलपी आणि थोवलाई केंद्रांमधून सुमारे २५० अभ्यासी आले होते. तीन भगिनींनी लालाजींचे लिखाण, लालाजींचे जीवन आणि लालाजींची शिकवण यावर खुसखुशीत आणि छोटेसे भाषण केले. सादरीकरणानंतर गुरुदेवांच्या शिकवणीवर गट चर्चा करण्यात आली. दुपारच्या जेवणानंतर तिथे उचला आणि बोला असे एक सत्र घेण्यात आले, ज्यात अभ्यासी उत्स्फुर्तपणे दिलेल्या विषयावर बोलत होते.


मेंगलोर

खंड ४ अंक २ मार्च २०११
श्री राम चन्द्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

## तंजावूर – प्रकाशाचे नवीन केंद्र

तामिळनाडूतील तंजावूर जिल्ह्याला गुरुदेवांची मातृभूमी असे म्हणता येईल. आपल्या मिशनचा आश्रम या ठिकाणी असावा ही त्यांची अनेक दिवसांपासून आकांक्षा होती. अनेक वर्षांच्या शोधकार्यानंतर थिरुवरुरला जाणाऱ्या रस्त्यापासून १४ कि.मी. अंतरावर आश्रमाकरिता योग्य जमीन मिळवण्यात अभ्यासींना यश आले. गुरुदेवांच्या इच्छेप्रमाणे नारळ, व आंब्याच्या वृक्षांनी आच्छादलेला १० एकरांचा परिसर आश्रमाकरिता विकत घेण्यात आला आहे.

तसेच, २० एकर जागेवरती ४००० चौ. मीटरचा एक भूखंड याप्रमाणे अभ्यासी–सहनिवास वसवण्याची पूर्वतयारी चालू आहे. गुरुदेवांच्या इच्छेनुसार या सह–निवासात बागकामासाठी मोठी जागा असणारे भूखंड असतील. या ठिकाणी पाण्याची उत्तम सोय आहे.

भूखंडांच्या किमतीत रस्ते, पाणी–पुरवठा, मलनि:सारण इत्यादींचा अंतर्भाव असल्यामुळे अभ्यासींना लवकरच येथे घरे बांधता येतील व लवकरच उभारल्या जाणाऱ्या आश्रमासाठी मदत करता येईल व त्याचा लाभ घेता येईल.

## व्हि.बि.एस.सी. कार्यक्रम, वडोदरा

बरोडा हायस्कूल, अलकापुरी येथील इयत्ता सहावी व सातवीच्या सुमारे ४५





विद्यार्थ्यांकरिता वडोदऱ्याच्या व्हि.बि.एस.सी. स्वयंसेवकांनी संघ उभारणी(टीम बिल्डींग) या विषयावर तीन तासांच्या एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. 'संघाच्या शक्तीचे महत्त्व हसत–खेळत समजावे' हा या कार्यक्रमागील उद्देश होता. संघ उभारणीचे पाच प्रमुख घटक–जबाबदारी, सहभाग, परस्परांना मदत, संवाद व वाद–विवादांची हाताळणी हे अनेक खेळ व सादरीकरणे यांद्वारे शिकविले गेले.

'बदकांचे उड्डाण' नामक एक सादरीकरण 'जबाबदारी' ह्या कल्पनेची ओळख करून देण्याकरिता दाखविण्यात आले. वस्तूंची ओळख व संवाद याच्यावर आधारित एक खेळ 'परस्पर संवादाचे' महत्त्व जाणून घेण्याकरिता खेळण्यात आला. सहाय्य व सार्वजनिक उद्देश यांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी 'जितके अधिक जिंकाल तितके उत्तम' हा खेळ खेळण्यात आला.

सहभागी विद्यार्थ्यांनी प्रत्येक खेळात लक्षपूर्वक व तन्मयतेने भाग घेतला. विद्यालयाने या कार्यक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व अशा कार्यशाळा इतर विषयांकरिताही आयोजित केल्या जाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

## तणावाचे व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा, विशाखापट्टणम

भारतीय नौसेनेच्या अधिकारी व खलाशी वर्गासाठी तणावाचे व्यवस्थापन या विषयावर एक कार्यशाळा आय.एन.एस. सातवाहन येथे दि. ९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. या विषयावरची एक पुस्तिका आदल्या दिवशी सहभागी होणाऱ्या व्यक्तींना देण्यात आली होती. पाणबुडी विद्यालयाचे प्रमुख, कमांडर श्रीराम अमुर यांच्या प्रास्ताविकपर भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'ध्यानामधून तणावाचे व वेळाचे व्यवस्थापन' या विषयावर बंधू वि.आर.एस. नागसर्मा यांनी भाषण केले. या दरम्यान त्यांनी सहज मार्गाची मूळ कल्पना विषद केली. बंधू जी.वी. रवींद्र यांनी हिंदी भाषेत उपस्थितांना संबोधित केले. यानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला ज्यामध्ये श्रोत्यांच्या शंकाचे समाधान करण्यात आले.

बंधू के.एस. सप्तमुखुलु यांनी सहभागी झालेल्या १५० व्यक्तींना विशाखापट्टणम आश्रमाला भेट देण्याचे निमंत्रण दिले. अनेक उपस्थितांनी सहज मार्गाच्या साधनेबद्दल कुतूहल दर्शविले. त्यांना प्रारंभिक सिटींग देण्यात आली.

## प्रशिक्षक सभा, नेत्रमपल्ली

दि. ७ व ८ जानेवारी रोजी तामिळनाडू येथील सुमारे ५५ प्रशिक्षकांकरिता नेत्रमपल्ली आश्रम येथे एका सत्राचे आयोजन करण्यात आले होते. बंधू ए.पी. दुरै (संयुक्त सचिव) व बंधू एस. प्रकाश (विभाग प्रमुख) यांनी ह्या कार्यक्रमाचे संचालन केले. केंद्रांच्या विकासाकरिता काय करावे तसेच नवीन प्रशिक्षकांच्या निवडीकरिता मार्गदर्शक सूत्रे यावर बंधू प्रकाश यांनी भाष्य केले. 'जे अभ्यासी मिशन करिता काम करतात, त्यांना गुरुदेव मौल्यवान समजतात'. असे बंधू ए.पी.



दुरै आपल्या भाषणात म्हणाले, 'उमेदवार प्रशिक्षकाचे चैतन्य त्याच्या गुरुदेवांच्या कामातील सहभागामुळे सिद्ध होऊ शकते. हे आवश्यक आहे' असेही ते पुढे म्हणाले. बंधू पेरुमल (व्यवस्थापक–क्रेस्ट–बेंगलोर) यांनी 'प्रशिक्षणाची गरज' या विषयावर आपले विचार मांडले. बंधू एन.एस.नागराजा मिशनची वृद्धि व त्यापुढील समस्या याबाबत बोलले.

बंधू प्रकाश यांनी 'सोनेरी शांतता' या सत्रात आत्मनिरिक्षण करण्याकरिता उपस्थितांना दहा प्रश्नांची प्रश्नावली दिली. 'इतरांमध्ये चारित्र्य–निर्मिती कशी करावी?','घरामध्ये ओपन–हाऊस करण्याचा अनुभव', 'सहज मार्गाबद्दल अंधश्रद्धा व त्यांच्यावर कशी मात करावी', 'सिटींग देण्याखेरीज गुरुदेवांकरिता मी काय करू शकतो'?, 'आदर्श अभ्यासी व आदर्श प्रशिक्षक यांची कल्पना' अशा विषयांवर समूह चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. प्रशिक्षकांकरिता आयोजित केलेल्या दोन खेळांमुळे मौज व हास्य यांची बरसात झाली. सहभागी झालेल्या प्रशिक्षकांमधील समज–गैरसमजांचे निराकरण करण्याची व सर्वांना एकत्र आणण्याची ही एक उत्तम संधी होती. प्रश्नोत्तरांच्या सत्रामध्ये पाच जणांच्या समूहाने विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. क्रिकेटच्या खेळाने या सत्राची सांगता झाली.

खंड ४ अंक २ मार्च २०११
श्री राम चन्द्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता भाषण, पालक्कड, केरळ

'ध्यान' व 'ध्यानाची गरज व फायदे' या विषयांवर बंधू रविंद्रनाथन व बंधू मोहनदास ए.के.यांनी मन्नमपट्टा, पालक्कड येथील व्हि.टी. भट्टाथिरिपाद महाविद्यालयातील विद्यार्थांना सहज मार्गाचा संदर्भ देऊन संबोधित केले.

व्यक्तिमत्व विकासात ध्यानाची भूमिका, एकाग्रता व रोजच्या जीवनातील शिस्त यावर सखोल विवेचन करण्यात आले. बंधू रविंद्रनाथन यांनी युवकांचे अधिकार व जीवनातील ध्येय निश्चित करण्याचे महत्त्व या बाबत आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांनी इच्छाशक्ती निर्माण करावी, अहंकाराचे उदात्तिकरण करावे व आळशीपणावर मात करावी असे त्यांनी या वेळी सांगितले.

एकाग्रता, रागाचे व्यवस्थापन इत्यादि विषयांवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली व बंधू वत्साकुमार यांनी केलेल्या आभार-प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. प्रथम सिटींगसाठी लागणारे प्रशिक्षकांचे पत्ते व इतर माहिती या वेळी देण्यात आली.

## सामूहिक चर्चा, मुरादाबाद

योगश्रम, मुरादाबाद येथे दि. ६ फेब्रुवारी रोजी पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'चारित्र्याची जडण-घडण' या विषयावर सुमारे ५० अभ्यासींनी चर्चा केली. बंधू श्रवण यांनी उपस्थितांना विषयाची ओळख करून दिल्यानंतर चर्चेला सुरुवात झाली. या विषयाच्या प्रत्येक पैलूवर सखोल विचार-विनिमय करण्यात आला. बंधू राम, भगिनी नीलम व बंधू अजित यांनी उत्साहाने हा कार्यक्रम व त्यानंतरचा प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम संचालित केला.

## शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, बंगलोर

ज्या अभ्यासींना ओपन हाऊस, व्हि.बि.एस.सी., स्वागत कक्ष, उद्घोषणा, युवकांकरिता कार्यक्रम अशा मिशनच्या कामात रुचि आहे त्यांच्याकरिता बंगलोर केंद्राने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

श्रोत्यांसमोर बोलताना काय बोलावे, कसे बोलावे, हालचाली, बोलण्याची शैली, आवाजाची प्रत इत्यादी पैलूंचा या कार्यशाळेत समावेश होता. हा कार्यक्रम तीन महिने व तीन सत्रात विभागलेला होता. पहिली दोन सत्रे बनशंकरी आश्रम येथे तर शेवटचे सत्र क्रेस्ट येथे निवासी कार्यक्रमाच्या स्वरूपात झाले.

अनेक अनुभवी वक्त्यांनी प्रशिक्षणार्थींना महत्त्वाची माहिती दिली व स्वत:च्या अनुभवांची देवाण-घेवाणही केली. सहभागी झालेल्यांना निरनिराळे विषय देण्यात आले व त्यावर ५ ते ७ मिनिटे बोलण्याकरिता सांगण्यात आले. यावर अभिप्राय देऊन सुधारणेकरिता कुठे वाव आहे हे सुचविण्यात आले. क्रेस्ट येथे झालेल्या शेवटच्या सत्रात प्रशिक्षणार्थींना त्यांच्या नैपुण्याच्या क्षेत्रातील जबाबदारी टाकण्यात आली.

हा कार्यक्रम अभ्यासींना मिशनच्या कामकाजातील नवीन संधींची ओळख करून देतो. तसेच,गुरुदेवांच्या कृपेने केवळ अभ्यासींच्या स्वत:च्याच नव्हे तर मिशनच्या विकासालाही हातभार लावतो.

## युवकांवर प्रकाशझोत, हैदराबाद

विभागीय आश्रम, हैदराबाद येथे दि. ८ व ९ जानेवारी रोजी सुमारे १२० तरुणांकरिता 'युवक संमेलन' भरवण्यात आले होते. विभाग-प्रमुख बंधू अनंत यावेळी म्हणाले की आपल्या दैनंदिन जीवनात आपण जे काही करतो त्याने आपल्या आध्यात्मिक उद्देशाला आधार दिला पाहिजे.

'मिलान युथ वर्कशॉप', 'सेमिनार्स इन चायना' व 'स्पिरिच्युअलिटी – द न्यु कल्चर ऑफ हार्मनी अँड ब्रदरहूड' या सी.डी. या वेळी दाखविण्यात आल्या. सहभागी युवक काही खेळ खेळले व त्यांनी स्वयंसेवी काम अत्यंत उत्साहाने केले.

पूज्य बाबूजी महाराजांच्या जीवनावरील चित्रपट 'द जर्नी इन टाईम (पार्ट १)' अभ्यासींच्या हृदयाला स्पर्शून गेला. बंधू अनंत, भगिनी मधुमती व बंधू श्रीनिवास राव यांनी प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमाचे संचालन केले ज्यामधे साधनेच्या जवळ-जवळ सर्व पैलूंचा समावेश होता. अनेकांना माहित नसलेल्या मिशनच्या कार्यक्रमांबद्दल व व्यवस्थापनाबद्दल बंधू रघू यांनी सादरीकरण केले. अत्यंत पवित्र अशा आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव उपस्थितांना सहा सत्संगांमुळे मिळाला.

दि. ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान 'उत्क्रांतीकरिता गुंतवणू' कहा कार्यक्रम १५ तरूण, होतकरु व उत्साही युवकांकरिता आयोजित करण्यात आला होता. बंधू अनंत यांनी कार्यक्रमाची रुपरेषा स्पष्ट केली. या कार्यक्रमात दोन व्यक्तींमधील कल्पनांच्या देवाण – घेवाणीसह आत्मनिरिक्षणाचे सत्र, छोट्या गटांमध्ये परस्पर संवादाचे सत्र, प्रत्येक सहभागी व्यक्तीला वैयक्तिक सिटींग, दृक – श्राव्य सत्रे व युवकांना आनंददायी वाटणारा रात्रीच्या भोजनानंतरचा सुरेख चित्रपट यांचा समावेश होता.

प्रत्येक सहभागी युवकाला महत्त्वाचे अंतर्गत बदल झालेले जाणवले, स्वत:च्या विकासात स्वत:च्या गुंतवणुकीचे आकलन झाले व आपल्या उत्क्रांतीची निकड जाणवली. सत्राच्या शेवटी युवकांचे हर्षोत्फुल्ल चेहरे स्वत:च्या उत्क्रांतीबाबत त्यांना वाटणाऱ्या खात्रीची साक्ष देत होते. दोन्ही कार्यक्रमांबद्दलचा अभिप्राय अत्यंत उत्साहवर्धकहोता व अशा प्रकारची अजून संमेलने व्हावीत असे मत सहभागी झालेल्या बऱ्याच युवकांनी व्यक्त केले.





केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक २ मार्च २०११

श्री राम चन्द्र मिशन®

एकोज इंडिया वार्तापत्र

## भुवनेश्वर येथील भगिनी अभ्यासींचा उपक्रम

ऑक्टोबर २०१० पासून भुवनेश्वर केंद्रातील भगिनी अभ्यासींनी महिन्यातून एकदा एकत्र भेटण्यास सुरुवात केली आहे.आत्तापर्यंत त्यांच्या अशा चार बैठका झाल्या आहेत. एका भगिनी प्रशिक्षकाची उपस्थितीची खात्री करूनच या बैठकांचे आयोजन करण्यात येते. याबैठकीत सहजमार्गाच्या एका कोणत्याही महत्त्वाच्या विषयावर आपापले अनुभव व मते यांची देवाणघेवाण केली जाते. प्रशिक्षिक भगिनीकडून शंकांचे निरसन केले जाते. पहिल्या चार बैठकांमध्ये ध्यान, शुद्धीकरण, प्रार्थना, आणि आश्रम या चार विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीतील सुसंवादामुळे अभ्यासी भगिनींमध्ये साधनेची समज वाढण्यास मदत झाली. तसेच पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमात मोकळेपणाने चर्चेमध्ये सहभागी होणे या बैठकींमुळे त्यांना शक्य झाले.

अभ्यासी भगिनींनी स्वयंपाकगृहाचे पुनर्व्यवस्थापन करून रविवारच्या सत्संगानंतर नाष्टा देण्याचेही काम सुरु केले आहे.

गेले तीन महिने संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमात चर्चेनंतर अर्धा तास पूर्ण मौन पाळले जात आहे. येथील अभ्यासी केंद्रात काम करताना, पुस्तके वाचताना, डोळे उघडे ठेवून शांततेचा अनुभव घेतात. ही गोष्ट अतिशय उत्तमरित्या येथे चालू आहे. अभ्यासी अशा मौन–सत्रांची आतुरतेने वाट पहात असतात.

## डेली रिफ्लेक्शन–एक पुढाकार

पूज्यगुरुदेवांची अवतरणे रोज ई–मेल द्वारे इंटरनेटवरून सभासदांना पाठविण्याचा उपक्रम 'डेली रिफ्लेक्शन' या नावाने आपल्या मिशनद्वारे राबविला जातो. या संदर्भात सर्व अभ्यासींना माहिती व्हावी म्हणून विदिशा, मध्यप्रदेश येथे संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे दि. १७ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते.

मिशन साहित्यातून उध्दृत केलेले 'डेली रिफ्लेक्शन' चे हिंदी भाषांतर एक अभ्यासींचा चमू जवळजवळ २५ दिवस नियमितपणे वाचत असे. प्रत्येक अभ्यासीला एक संदेश दिला जाई व त्याला स्वत:चे आचरण, साधना, वर्तणूक आणि समज यांचे अवलोकन करण्यास सांगितले जाई. त्यांच्या विचारांची आपसात देवाणघेवाणही केली जाई.

मौनाचा आवाज, मौन, काळ, संस्कार, ठसे, मिशन, ईश्वराची जाणीव, माझेअस्तित्व, मुले, मन, आश्रम,काम कसे करावे, आपली भेट, धर्म आणि आध्यात्मिकता तसेच प्रगती असे विविध विषय या वेळी हाताळण्यात आले. यात भाग घेतलेल्या बंधू–भगिनींकरिता हा एक समृध्द करणारा अनुभव होता. या उपक्रमामुळे भुवनेश्वर केंद्रातील अभ्यासींमध्ये 'डेली रिफ्लेक्शन' वाचण्याबद्दल जागरूकता निर्माण झाली.

## अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

भारतातील विविध केंद्रांमध्ये अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात आहे. सहजमार्ग साधनेची उत्तम समज निर्माण करणे व अभ्यासींना वैयक्तिक साधनेत येत असलेल्या शंकांचे निरसन करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश्य आहे.या कार्यक्रमात ध्यान,शुद्धीकरण, दहा नियम, प्रार्थना आणि सतत स्मरण या विषयांचे सखोल स्पष्टीकरण दिले गेले आहे. कार्यक्रमाच्या अखेरीस होणाऱ्या प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमामुळे सर्व शंकांचे निरसन होण्यास मदत होत आहे. खाली दिलेल्या सर्व केंद्रांमधून हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमामुळे अभ्यासींना त्यांची साधना उत्तम आणि योग्यरित्या करण्यास प्रोत्साहन मिळत असल्याचेही अभ्यासी बंधू–भगिनींनी सांगितले. सर्वच अभ्यासींसाठी वेळोवेळी उजळणी म्हणून असा उपक्रम राबविला पाहिजे असेही बऱ्याच जणांनी सांगितले.

### वलसाड, गुजरात

वलसाड, सुरत, पारडी, भरुच,नवसारी, वापी, खेरगाम, किल्ला इ. केंद्रांमधून सुमारे २४



वलसाड

अभ्यासींनी यात सहभाग घेतला. हा उपक्रम गुजराती भाषेतून राबविला गेला.



गुलबगा

### गुलबर्गा, कर्नाटक

बंधू प्रल्हाद पाकनिकेर यांनी दि. २ जाने. २०११ रोजी गुलबर्गा आश्रमात या उपक्रमाचे आयोजन केले होते. यात ४० अभ्यासींनी सहभाग घेतला.



रायचूर

### रायचूर , कर्नाटक

बंधू प्रल्हाद पाकनिकेर व बंधू निजलिंगप्पा यांनी ९ जाने रोजी रायचूर आश्रमात हा उपक्रम राबविला. यात सुमारे ४० अभ्यासींनी सहभाग घेतला.



मुंबई

### खारघर , नवी मुंबई

भगिनी नंदिता माथूर यांनी एका भगिनी अभ्यासीच्या घरी १५ अभ्यासींसाठी हा उपक्रम राबविला.

### जोगेश्वरी, मुंबई

भगिनी सुनिता यांनी ११ अभ्यासींसाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

केवळ खाजगी वितरणाकरिता
खंड ४ अंक २ मार्च २०११
श्री राम चन्द्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# निबंध स्पर्धा २०१० प्रशस्तिपत्रक वितरण


परमकुडी



अलाहाबाद


नहरलगुन

नवीन पिढीसाठी दरवर्षी 'अखिल भारतीय निबंध स्पर्धेचे' आयोजन करण्यात येते. यात नवी पिढी त्यांच्या जीवनातील नैतिक मूल्यांविषयी विचार करण्यास उद्युक्त होते. यामुळे त्यांच्या हृदयात सहजमार्गाची बीजे रोवण्याबरोबरच वैश्विक प्रेम, बंधूभाव आणि मानवी एकत्रीकरण या मूल्यांचाही विचार करण्यास प्रवृत्त केले जाते. यावर्षी तीन वयोगटातील सुमारे ११५०० शैक्षणिक संस्थांमधील ५,००,००० युवांनी खालील विषयांवर निबंध लिहिले.

* चारित्र्य जीवनाची सुरक्षा करते.

* स्वातंत्र्य म्हणजे परवाना नसून आपल्यासाठी जे योग्य ते निवडण्याचे शहाणपण होय.

* महत्त्वाकांक्षेपासून आकांक्षांपर्यंत, प्राप्त करण्यापासून बनण्यापर्यंत

निबंधाचे मूल्यमापन करून प्रत्येक केंद्रात पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले ज्यात स्पर्धकांना प्रशस्ति पत्रके प्रदान करण्यात आली. यात पालक, शिक्षक व विद्यार्थी यांना आमंत्रित करण्यात आले होते.

## मध्य प्रदेश

दि. २३ जाने. रोजी संपूर्ण मध्य प्रदेश विभागातील विजेत्यांना बक्षीसे प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला. यात खुल्या सत्राचेही आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अखेरीस "जीवनातील मूल्यांचे महत्त्व" या विषयावर छोटे भाषण झाले. अखेरीस, मिशन आणि आध्यात्मिकता या विषयी माहिती देण्यात आली . त्यामुळे ब-याच जणांनी मिशनमध्ये प्रवेश घेण्यास उत्सुकता दर्शविली.

## अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेश, शिलॉंग(मेघालय), इम्फ़ाळ आणि सी.सी.पुर (मणिपूर) या केंद्रांमधून सुमारे ५३ शिक्षण संस्थांमधून ३५० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. दि. ३० जाने. ला नहरलगुन येथील आश्रमात झालेल्या बक्षीस समारंभात सुमारे १५० जण सहभागी झाले होते. प्रदेशवार व शाळावार प्रशस्तिपत्रके यावेळी प्रदान करण्यात आली. पू. गुरुदेवांचा व्हिडियो संदेश(युवकांना संदेश, १६ ऑक्टोबर २००९ ,दुबई) यावेळी दाखविण्यात आला. प्रादेशिक पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी आपली मते प्रकट करण्यास सांगितले गेले.

## तामिळनाडू

दि. ५ फ़ेब्रु. रोजी सेंट थॉमस इंग्लिश मीडियम हायस्कूल, गुडाळपूर येथे पहिला उपक्रम राबविला गेला. यावेळी एवढ्या छोट्या गावात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याबद्दल उपस्थितांनी कौतुक केले.

दि. ६ तारखेला ऊटी येथे हा कार्यक्रम राबविण्यात आला. यात १०० जण सहभागी झाले होते. या दोन्ही कार्यक्रमात बंधू विश्वनाथ(झोनल प्रमुख) आणि बंधू एम.एम. धनूमूर्ती यांनी सहजमार्गावर भाषण दिले. काही शाळांच्या मुख्याध्यापकांनी आणि पारितोषिक विजेत्यांनी आपले विचार मांडले.

दि. १३ फ़ेब्रु. रोजी अविनाशी येथे अविनाशी आणि पुलियांपत्ती येथील २० विजेत्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जवळजवळ ६० निमंत्रितांची यात उपस्थिती होती. अश्या निबंध लेखनाच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक ते गुण रुजविण्याच्या मिशनच्या प्रयत्नाविषयी बंधू टी.व्ही. विश्वनाथ यांनी भाषण दिले. सध्याच्या ताणतणावाच्या काळात ध्यानाचे महत्त्व या विषयावर बंधू सेशा मणिकंदन यांनी भाषण देले.

परमकुडी केंद्रात दि. ६ फ़ेब्रु. रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ९ शाळा व २ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यातील एकूण १४ विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

आपल्या चारित्र्य विकासात व अंतरंग बदलात ह्या निबंध स्पर्धेची खूप महत्त्वाची भूमिका असल्याचे बंधू कन्नन आणि बंधू मुरुगुन यांनी सांगितले. सहजमार्ग साधनेमुळे होणारे भौतिक आणि आध्यात्मिक जीवनातील फायदे यावरही भाषणे झाली. सहजमार्गाचे साहित्य, पुस्तके यावेळी उपस्थित शिक्षकांना देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांनी यावेळी आपले अनुभव सांगितले.

## आंध्र प्रदेश

दि. ६ फ़ेब्रु. रोजी विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक आणि प्राध्यापक असे सुमारे ५०० जण विशाखापट्टणमच्या आश्रमात एकत्रित झाले होते. सुमारे १०,००० स्पर्धकांमधून १६० जणांना पारितोषिके देण्यात आली.



उटी


अवीनाशी


इंदूर




तिनसुकीया



हैदराबाद



रांची

आध्यात्मिक जीवनाचे महत्त्व, आध्यात्मिक जागरुकतेची निर्मिती, चारित्र्य घडण, मानवी मूल्ये आणि मूल्याधारित शिक्षण या विषयांवर बंधू (केंद्र प्रमुख) गोपाल राव , प्रशिक्षक बंधू शर्मा आणि बंधू मूर्ती यांनी भाषणे दिली. या प्रदेशातून नऊ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरही बक्षीस पटकावले.

थुमकुंटा, हैद्राबाद येथे दि. ६ फेब्रु. ला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे २५० शैक्षणिक संस्थांमधून ४,००० विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. भगिनी मधूमती यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. बंधू अनंत (झोनल प्रमुख), बंधू श्रीनिवास राव(कें. प्र.) आणि यु. एन. संस्थेचे डॉ. कमल राज यांच्या हस्ते पारितोषिकांचे आणि प्रशस्तिपत्रकांचे वितरण झाले. शालेय, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावरील विजेत्यांनी ह्या कार्यक्रमात भाग घेतला.

गीतांजली देवाश्री शाळेच्या नवनीत कृष्णन याने राष्ट्रीय पातळीवर तिस–या क्रमांकाचे बक्षीस पटकावले. 'स्वागत कक्ष' यावेळी दिवसभर सहजमार्गाविषयी माहिती देण्यात कार्यरत होता.

## रांची

रोटरी हॉल, रांची येथे प्रादेशिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. श्याम नरेन, रजिस्ट्रार, झारखंड युनिवर्सिटी म्हणून उपस्थित होते. बंधू मनोज तिवारी यांनी या निबंध स्पर्धेच्या उद्देश्याविषयी सांगितले. सहभागी झालेल्यांनी या उपक्रमाच्या तयारीबद्दलच्या अनुभवांचे कथन केले. तसेच त्यांचे आयुष्याच्या प्रवासाबद्दल व लक्ष्याबद्दलचेही मत कसे बदलले हे ही सांगितले.

चारित्र्याने जीवन कसे सुरक्षित होते यावर प्रमुख पाहुण्यांनी भाषण दिले. जीवनाचा खरा अर्थ काय आणि आयुष्य अर्थपूर्ण बनण्यात स्वातंत्र्याची भूमिका काय असते यावरही ते बोलले. एका स्पर्धकाच्या आईने (श्रीमती शशी) मिशनच्या कार्याचे कौतुक केले. शिक्षक श्री. आलोक यांनी मिशनला धन्यवाद दिले.

## आसाम

केंद्र प्रमुख बंधू परिजीत फुकान यांच्या मिशनविषयीच्या भाषणाने गुवाहाटी येथे कार्यक्रमाची सुरुवात झाली. सुमारे ८४ विद्यार्थी, पालक, शिक्षक यावेळी उपस्थित होते. बंधू अशोक सेनगुप्ता यांनी मनाचे नियमन व हृदयावरील ध्यानाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. त्यांनी वैश्विक बंधूभाव निर्माण करण्याबद्दल मिशन व यू. एन. च्या एकत्र येऊन काम करण्याविषयी खास सांगितले. तसेच मूल्याधारित शिक्षणाविषयी माहिती दिली. यामुळे विद्यार्थी, पालक,शिक्षक यांना ध्यान आणि अध्यात्माबद्दल जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली.

दुपारच्या भोजनाच्या वेळी उपस्थितांनी बरेच प्रश्न व माहिती विचारली. त्यांना प्रशिक्षकांनी व ज्येष्ठ अभ्यासींनी उत्तरे दिली.

दि. २ फेब्रु. रोजी तिनसुकीया आश्रमात सुमारे ६० विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली. बंधू कैलाश अगरवाल(कें.प्र.) आणि बंधू अशोक सेनगुप्ता यांनी मिशन व तिच्या जागतिक उपक्रमांवर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षणातील काही व्यावहारिक अनुभवांच्या आधारे ध्यानाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यामुळे उपस्थितांना प्रोत्साहन मिळाले.

## प.बंगाल

बाबुजी मेमोरियल आश्रम, कोलकता येथे २३ जानवारी रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून भवानीपूर, गुजरात शिक्षण संस्थेचे शिक्षण महर्षी श्री. मंगल शांघवी उपस्थित होते. तसेच टाईम्स ऑफ इंडियाचे निवासी उपसंपादक श्री केशव प्रधानही यावेळी उपस्थित होते.

सुमारे ४५ संस्थांनी यात भाग घेतला होता. यात कोलकत्याबरोबरच दार्जिलिंग, सिलिगुडी आणि राणीगंज येथील शाळांचाही समावेश होता.

कार्यक्रमात ५० हून अधिक पारितोषिक विजेते तसेच ८० शिक्षक, पालक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व श्री केशव प्रधान यांच्या भाषणांचा त्यांनी आंनद घेतला. यावेळी बंधू रिषभ कोठारी यांनी मिशन आणि यू. एन.च्या वैश्विक बंधूत्वाच्या समान ध्येयावर प्रकाश टाकला.

या प्रदेशातील दोन स्पर्धक हुईशा गनेरीवाल, लोरेटो हाऊस (१ला क्र. विभाग–१) आणि इप्सिता दासगुप्ता (२ क्र. विभाग–२) यांनी राष्ट्रीय पातळीवर पारितोषिके पटकावली. सर्व विजेत्यांना प्रशस्तिपत्रकाबरोबरच 'युवावस्था वचन आणि प्रयत्न' या पुस्तकांच्या प्रतीही देण्यात आल्या.

सात्विक आणि भारवलेल्या वातावरणाने उपस्थितांना अंतर्मुख होऊन सहजमार्गाविषयी अधिक जाणून घेण्यास उद्युक्त केले. ब–याच जणांनी पुस्तक दालनात जाऊन पुस्तकांची व साधनेची माहिती जाणून घेतली.

पारितोषिक वितरणाद्वारे विद्यार्थ्यांच्या कुटुंबापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे पारितोषिकांच्या पलिकडे जाऊन त्यांच्या हृदयाची तार छेडली गेली.

केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक २ मार्च २०११

श्री राम चन्द्र मिशन®

एकोज इंडिया वार्तापत्र

# प्रकाशाचे केंद्र

## जयपूर, विभागीय आश्रम







राजस्थान राज्याची राजधानी असलेल्या जयपूर शहरातील आश्रम हा राजस्थानचा विभागीय झोनल आश्रम आहे. हा आश्रम जयपूर-अजमेर राजमार्गावर असून जयपूर शहराच्या केंद्रापासून १९ कि.मी. व विमातळापासून २३ कि.मी. अंतरावर आहे. हा आश्रम ऑगस्ट २००२ साली संपादित केलेल्या १० एकर जागेवर पसरलेला आहे. ह्याला लागुनच 'मास्टर क्रिएशन' नावाची अभ्यासी वसाहत एकवीस एकर जागेवर पसरलेली आहे.



दि. २७ ऑक्टोबर २००२ रोजी जेव्हा गुरुदेवांनी ह्या ठिकाणी भेट दिली तेव्हा येथे बांबूने बांधलेले ध्यान कक्ष, स्वयंपाक घर, कार्यालय व गुरुदेवांचे कॉटेज होते. त्यांच्या पुढील भेटींमध्ये गुरुदेवांनी आश्रम व निवासी संकुल बांधकामाच्या आराखड्याला स्पष्ट रूप दिले. त्यांच्या निर्देशानुसार आश्रमाचे बांधकाम राजस्थानी वास्तुकलेप्रमाणे करण्यात आले.

दि. १७ मे, २००९ रोजी गुरुदेवांनी भूमिपूजन केल्यानंतर, अभ्यासी स्वयंसेवकांच्या उल्हासपूर्ण सहभागाने, पंधरा महिन्यांमध्ये बांधकाम पूर्ण झाले. दि. ३० जुलै २०१० रोजी, राजस्थान व शेजारच्या राज्यांच्या अभ्यासींच्या उपस्थितीत पू. गुरुदेवांनी हा विभागीय आश्रम त्यांचे गुरुदेव, पूज्य बाबुजींना समर्पित केला. पू. गुरुदेवांनी दुसऱ्या दिवशी आपल्या भाषणामध्ये नमूद केले की राजस्थान त्यांच्या आवडीच्या ठिकाणांपैकी एक आहे. पुढे ते म्हणाले कि जेव्हा समर्पण असते तेव्हा निसर्गाचे सर्व आशीर्वाद आपल्या बरोबर असतात.



आश्रमाचा आराखडा चांगल्या पद्धतीने तयार केला असुन ध्यान-कक्ष १०००० चौ. फ़ूट व गुरुदेवांचे कार्यालय ६३०० चौ. फ़ूट असे आहे. विश्रांतीकक्षामध्ये ३०० हुन अधिक अभ्यासी राहु शकतात व तळघरामध्ये कार्यालय आहे. विविध प्रकारच्या झाडांमुळे व रोपट्यांमुळे संपूर्ण आश्रम सुंदर व रमणीय झाला आहे.



आश्रमातील शांतीपूर्ण व दैवी वातावरणामुळे अभ्यासींच्या कार्यक्षमतेला चालना मिळत आहे. वर्षभर विविध प्रशिक्षण कार्यक्रम, मुल्याधारीत आध्यात्मिक शिक्षण उपक्रम, निबंध स्पर्धा, लहान मुलांसाठी व तरुणांसाठी कार्यक्रम, खुले चर्चासत्र आणि गटांचे चर्चासत्र आयाजित केले जातात.

गुरुदेवांच्या कृपेमुळेच हे 'प्रकाशाचे केंद्र', मिशनसाठी काम करण्याची व गुरुदेवांच्या अपेक्षेप्रमाणे स्वत:चा विकास करण्याची संधी अभ्यासींना उपलब्ध करुन देत आहे.










© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.